# प्रकरण-I

# प्रस्तावना

# प्रकरण-I

## प्रस्तावना

### 1.1 या अहवालासंबंधी

प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रातील महाराष्ट्र शासनाचे विविध समुहांतर्गत (क्लस्टर) येणारे शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांच्या अनुपालन लेखापरीक्षणातून उद्भवलेल्या बाबीसंबंधी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल आहे. या कार्यालयाद्वारे लेखापरीक्षित विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची समूहनिहाय यादी **तक्ता 1.1** मध्ये दर्शविली आहे. तपशील **परिशिष्ट 1.1** मध्ये दिलेला आहे.

**तक्ता 1.1: लेखापरीक्षित विभाग,स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची समूहनिहाय यादी**

| समुहाचे नाव | विभागांची संख्या | स्वायत्त संस्थांची संख्या | सार्वजनिक उपक्रमांची संख्या |
|---|---|---|---|
| आरोग्य व कल्याण | 07 | 03 | 14 |
| शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार | 05 | 01 | 03 |
| ग्रामीण विकास | 01 | -- | 01 |
| कृषी, अन्न व संलग्न उद्योग | 03 | -- | 07 |
| जलसंपदा | 02 | 07 | 03 |
| नगर विकास | 02 | 05 | 05 |
| संस्कृति व पर्यटन | 01 | -- | 04 |
| सामान्य प्रशासन | 03 | 01 | 01 |
| **एकूण** | **24** | **17** | **38** |

भारताच्या संविधानाच्या तरतुदी, लागू (प्रयोज्य) कायदे, नियम, विनियम आणि सक्षम अधिकाऱ्यांनी जारी केलेले विविध आदेश व सूचनांच्या अनुपालनाची खातरजमा करुन घेण्यासाठी लेखापरीक्षित संस्थांच्या खर्च आणि महसुलाची तपासणी करणे यास अनुपालन लेखापरीक्षा असे संबोधतात.

लेखापरीक्षेचे महत्वाचे निष्कर्ष राज्य विधिमंडळाच्या नजरेस आणून देणे हा अहवालाचा मुळ/प्राथमिक हेतु आहे. स्वरुप, परिमाण आणि व्यवहारांची व्याप्ती याच्या अनुरुप सादरीकरणाचा स्तर असावा हे लेखापरीक्षेच्या मानकांत अभिप्रेत असते. सुधारणात्मक कार्यवाही करण्यास तसेच धोरण ठरविण्यास, निर्देश देण्यास लेखापरीक्षेचे निष्कर्ष कार्यकाऱ्यांना असे सहाय्यभूत ठरावेत की ज्यामुळे संस्थांची प्रचालन कार्यक्षमता व आर्थिक व्यवस्थापन सुधारीत करता येईल. जेणेकरुन उत्तम शासन व्यवस्थेस हातभार लागेल.

या प्रकरणात लेखापरीक्षेचे प्राधिकार, संघटनात्मक संरचना, नियोजन व लेखापरीक्षेची व्याप्ती आणि लेखापरीक्षेप्रति शासनाचा प्रतिसाद विशद केले आहेत. प्रकरण II मध्ये शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या अनुपालन लेखापरीक्षेतून उद्भवणाऱ्या निरीक्षणांचा समावेश आहे.

अनुपालन लेखापरीक्षा अहवालाव्यतिरिक्त, संपादणूक अहवाल स्वतंत्रपणे तयार केले जातात.

## 1.2 लेखापरीक्षित संस्थांची रूपरेखा

राज्यातील सचिवालय स्तरावरील शासकीय विभागांचे प्रमुख अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव असतात आणि त्यांना संचालक/आयुक्त तसेच कनिष्ठ अधिकारी सहाय्य करतात.

मागील वर्षाच्या तूलनेत वर्ष 2019-20 व 2020-21 मधील राज्य शासनाच्या राजकोषीय व्यवहारांची संक्षिप्त स्थिती **तक्ता 1.2** मध्ये दिली आहे.

**तक्ता 1.2: वर्ष 2019-20 आणि 2020-21 मधील राज्य शासनाच्या राजकोषीय व्यवहारांची संक्षिप्त स्थिति**

**(₹ कोटीत)**

| 2018-19 | जमा | 2019-20 | 2020-21 | | 2018-19 | संवितरणे | 2019-20 | 2020-21 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | भाग अ: महसुली | | | | | | एकूण | |
| **278996** | **महसुली जमा** | **283190** | **269468** | | **267022** | **महसुली खर्च** | **300305** | **310610** |
| 187436 | कर महसूल | 188948 | 164255 | | 84765 | सर्वसाधारण सेवा | 100050 | 103854 |
| 15844 | करेतर महसूल | 14297 | 15976* | | 109391 | सामाजिक सेवा | 122947 | 122024* |
| 42054 | केंद्रिय कर/शुल्कांचा हिस्सा | 36220 | 36504 | | 52759 | आर्थिक सेवा | 56044∗ | 64336 |
| 33662 | भारत सरकारकडून अनुदाने | 43725 | 52733 | | 20107 | सहाय्यक अनुदाने आणि अंशदाने | 21264 | 20396 |
| भाग ब-भांडवली व इतर | | | | | | | | |
| 0 | संकीर्ण भांडवली जमा | 0 | 0 | | 35049 | भांडवली खर्च | 36416 | 29687 |
| 1604 | कर्ज आणि अग्रिमांची वसुली | 1615 | 1612 | | 1545 | कर्ज आणि अग्रिमांची संवितरणे | 1970 | 2342 |
| 26025 | लोक ऋण जमा@ | 55396 | 87357 | | 25116# | लोक ऋणांचे परतावे@ | 22868 | 26427 |
| 1528 | आकस्मिकता निधीतून विनियोजने | 7350 | 11500 | | 3528 | आकस्मिकता निधीस विनियोजने | 15350 | 1500 |
| 3528 | आकस्मिकता निधी | 15350 | 10500 | | 1528 | आकस्मिकता निधी | 16350 | 11500 |
| 90665 | लोक लेखा जमा | 119634 | 88531 | | 89758 | लोक लेख्यांची संवितरणे | 100329 | 74787# |
| | प्रारंभीची रोख शिल्लक | | | | | अंतिम रोख शिल्लक | | |
| 33971 | (अ) कर्ज निवारण निधि | 34488 | 41427 | | 34488 | (अ) कर्ज निवारण निधि | 41427 | 45738 |
| 54498 | (ब) रोख शिल्लक | 32781 | 15055$ | | 32781 | (ब) रोख शिल्लक | 14789 | 22859 |
| **490815** | **एकूण** | **549804** | **525450** | | **490815** | **एकूण** | **549804** | **525450** |

@ अर्थोपाय अग्रिमांमधील निव्वळ व्यवहार वगळून (जमा: ₹ 1,757.61 कोटी व संवितरणे: ₹ निरंक) (2019.20).

···· अर्थोपाय अग्रिमे आणि अधिकर्ष यांचे निव्वळ व्यवहार वगळून (जमा व संवितरणे ₹ 31,159 कोटी) (2020-21)

# निम्न पुर्णांकात

∗ उच्च पुर्णांकात

$ चुकीचे वर्गीकरण दुरुस्त केल्यामुळे प्रपत्रामध्ये समयोजित केलेला ₹266.57 कोटींचा फरक

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

## 1.3 लेखापरीक्षेसाठी प्राधिकार

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 149 आणि 151 अन्वये आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 अन्वये भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांना लेखापरीक्षेचे अधिकार प्राप्त झाले आहेत. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक, महाराष्ट्र शासनाचे शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामधील महसूल व खर्चाची लेखापरीक्षा भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 च्या तरतुदीनुसार आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी निर्गमित केलेल्या, लेखापरीक्षा आणि लेख्यांची नियमावली, 2020 नुसार करतात.

## 1.4 प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर, या कार्यालयांची संघटनात्मक संरचना

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या निर्देशानुसार, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र,नागपूर विविध शासकीय विभाग, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालये, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांची (लेखापरीक्षित संस्था) लेखापरीक्षा करतात. **तक्ता 1.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे आठ समूह प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र,मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रात आणि उर्वरित आठ समूह महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येतात.

**तक्ता 1.3: समुहांचा तपशील**

| अ. क्र. | प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या लेखापरीक्षा कार्यक्षेत्रातील समूह | महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपुर यांच्या लेखापरीक्षा कार्यक्षेत्रातील समूह |
|---|---|---|
| 1 | आरोग्य व कल्याण | ऊर्जा व वीज |
| 2 | शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार | उद्योग आणि वाणिज्य |
| 3 | ग्रामीण विकास | परिवहन/ वाहतूक |
| 4 | कृषी, अन्न व संलग्न उद्योग | पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान |
| 5 | जलसंपदा | सार्वजनिक बांधकाम |
| 6 | नगर विकास | वित्त |
| 7 | संस्कृति व पर्यटन | माहिती तंत्रज्ञान व दळणवळण |
| 8 | सामान्य प्रशासन | कायदा व सुव्यवस्था |

## 1.5 लेखापरीक्षेचे नियोजन व अंमलबजावणी

लेखापरीक्षित संस्था सामोरे जात असलेल्या जोखमीच्या निर्धारणाने लेखापरीक्षेची प्रक्रिया सुरु होते जी, केलेला खर्च, महसूल उत्पन्न, कार्यालयांमधील गंभीरता/गुंतागुंत, प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची पातळी, एकंदर अंतर्गत नियंत्रणाचे निर्धारण आणि हितैषींचे संबंध यांवर आधारीत असते. या प्रक्रियेत पूर्वी केलेल्या लेखापरीक्षेचे निष्कर्षही विचारात घेण्यात येतात. या जोखीमांच्या निर्धारणेच्या आधारावर

लेखापरीक्षेची वारंवारीता आणि व्याप्ती निश्चित करण्यात येते. वर्ष 2019-20 आणि 2020-21 मध्ये 42,168 दल-दिवस वापरुन 847 कार्यालयांची लेखापरीक्षा करण्यात आली. लेखापरीक्षकांनी ज्या कार्यालये/संस्थांना लक्षणीय प्रमाणात धोका असल्याचे अंदाजित केले होते त्यांचा समावेश लेखापरीक्षा आराखडयात करण्यात आला होता.

प्रत्येक कार्यालयाची लेखापरीक्षा पूर्ण झाल्यावर, लेखापरीक्षेची निष्पत्ती असलेले निरीक्षण अहवाल लेखापरीक्षित कार्यालयांच्या प्रमुखांना पाठविण्यात येतात. निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत लेखापरीक्षा निष्पत्तींवर उत्तर देण्याची विनंती लेखापरीक्षित कार्यालयांच्या प्रमुखांना करण्यात येते. जेव्हा उत्तरे प्राप्त होतात तेव्हा लेखापरीक्षा निष्पत्ती निकाली काढण्यात येते किंवा अनुपालनाची पुढील कार्यवाही करण्याचा सल्ला दिला जातो. या निरीक्षण अहवालांमध्ये नोंदविलेली महत्त्वाची लेखापरीक्षा निरीक्षणे लेखापरीक्षा अहवालात समाविष्ट करण्यासाठी संस्करीत करुन ते भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2) नुसार राज्यपालांना सादर करण्यात येतात.

## 1.6 लेखापरीक्षेस शासनाचा प्रतिसाद

### 1.6.1 प्रलंबित निरीक्षण अहवाल

शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांच्या व्यवहारांची चाचणी तपासणी करण्यासाठी आणि विहीत नियम व कार्यपद्धतीनुसार त्यांच्या लेखांकनाचे आणि इतर महत्वपूर्ण दस्तावेज ठेवले जात आहेत अथवा नाहीत याची पडताळणी करण्यासाठी त्यांच्या नियतकालिक तपासण्या केल्या जातात. या निरीक्षणांनतर निरीक्षण अहवाल तयार केले जातात जे तपासणी केलेल्या कार्यालयांच्या प्रमुखांना पाठविण्यात येतात आणि त्यांच्या प्रती निकटतम उच्च प्राधिका-यांना पाठविण्यात येतात. या निरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या लेखापरीक्षा अभिक्षणांवर केलेल्या कार्यवाहीवर संनियंत्रण करणे सुलभ व्हावे यासाठी संबंधित विभागांच्या सचिवांना प्रलंबित निरीक्षण अहवालांचे अर्धवार्षिक अहवाल पाठविण्यात येतात.

सप्टेंबर 2021 रोजी 3,966 निरीक्षण अहवाल (14,212 परिच्छेद) निपटा-यासाठी प्रलंबित होते. निरीक्षण अहवाल आणि परिच्छेद यांचा वर्षनिहाय तपशील **परिशिष्ट 1.2** मध्ये विषद केला आहे. यामध्ये असे लक्षात आले की 7,111 परिच्छेद असलेले 2,744 निरीक्षण अहवाल पाच वर्षांहुन अधिक काळ प्रलंबित आहेत. यावरून असे दिसून येते की लेखापरीक्षण अहवालातील त्रुटिचे निराकरण करण्यासाठी समयोचित व प्रभावी पावले उचलली जात नाहीत.

### 1.6.2 विभागीय लेखापरीक्षा समिती

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने सर्व प्रशासकीय विभागांना, प्रलंबित निरीक्षण अहवाल व परिच्छेद यांचे पुनरावलोकन आणि निराकरण करण्यासाठी, लेखापरीक्षा समिती गठित करून त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश (डिसेंबर 1985) दिले. लेखापरीक्षा समित्यांचे अध्यक्ष प्रशासकीय विभागाचे सहसचिव, सहसंचालक, लेखा व

कोषागारे हे सदस्य म्हणुन आणि उपसंचालक, लेखा व कोषागारे हे निमंत्रक असतात. लेखापरीक्षा कार्यालयातील उपमहालेखाकार पदापेक्षा कमी नसलेला प्रतिनिधी लेखापरीक्षा समितीला मदत करतो. लेखापरीक्षा समितीच्या बैठका प्रत्येक तिमाहीत किमान एकदा तरी आयोजित करणे आवश्यक आहे.

**तक्ता 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे वर्ष 2019-20 आणि 2020-21 मध्ये लेखापरीक्षा समितीच्या चार बैठका आयोजित केल्या होत्या.

**तक्ता 1.4: वर्ष 2019-20 आणि 2020-21 मध्ये मध्ये लेखापरीक्षण समितीच्या बैठकांचे आयोजन**

| अ.क्र. | प्रशासकीय विभागाचे नाव | आयोजित केलेल्या लेखापरीक्षण समितीच्या बैठकांची संख्या | बंद केलेल्या निरीक्षण अहवालांची संख्या | बंद केलेल्या परिच्छेदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक बांधकाम | 1 | 29 | 93 |
| 2 | आदिवासी विकास | 1 | 3 | 25 |
| 3 | जलसंपदा | 1 | 5 | 38 |
| 4 | महसूल व वन | 1 | 6 | 136 |
| **एकूण** | | **4** | **43** | **292** |

**तक्ता 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे निरीक्षण अहवाल आणि परिच्छेद मोठ्या प्रमाणात प्रलंबित असतानाही लेखापरीक्षा समितीच्या बैठका कमी प्रमाणात आयोजित केल्या होत्या. 2019-20 आणि 2020-21 दरम्यान, प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रातील 24 प्रशासकीय विभागांपैकी फक्त चार प्रशासकीय विभागांनी लेखापरीक्षा समिती बैठकीचे आयोजन केले होते.

### 1.6.3 प्रारूप परिच्छेदांना विभागाचा प्रतिसाद

ऑगस्ट 2021 व नोव्हेंबर 2021 दरम्यान 12 प्रारुप परिच्छेद (दोन संकल्पनाधारीत परिच्छेदांसहित) संबंधित विभागांच्या अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिवांना अर्धशासकीय पत्राद्वारे चार आठवडयाच्या आत उत्तर पाठविण्याच्या विनंतीसह पाठविण्यात आले. दोन संकल्पनाधारीत परिच्छेद आणि नऊ प्रारुप परिच्छेदासंबंधी शासनाची उत्तरे प्राप्त झाली, परंतु या अहवालातील एका प्रारुप परिच्छेदासंबंधी कोणतेही उत्तर प्राप्त झाले नव्हते.

### 1.6.4 लेखापरीक्षा अहवालांचा पाठपुरावा

जानेवारी 2001 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने जारी केलेल्या सूचनांनूसार, राज्य विधानमंडळाला लेखापरीक्षा अहवाल सादर केल्यावर तीन महिन्यांच्या आत प्रशासकीय विभागांनी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षा अहवालात समाविष्ट असलेल्या परिच्छेदांविषयी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लेखापरीक्षकांच्या पडताळणीनंतर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाला सादर करणे आवश्यक होते. परंतु, प्रशासकीय विभागाने या निर्देशांचे पालन केले नाही. वर्ष

2012-13 ते 2018-19 मधील प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती **तक्ता 1.5** मध्ये दर्शविली आहे. **परिशिष्ट 1.3** मध्ये विभाग-निहाय तपशील दर्शविला आहे.

**तक्ता 1.5: 2012-2013 ते 2018-2019 या कालावधीतील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या प्रलंबिततेची स्थिती**

| लेखापरीक्षा अहवाल | अहवाल सादर करण्याचा दिनांक | परिच्छेदांची व आढाव्यांची संख्या | प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| 2012-13 | 14 जून 2014(सा.सा. क्षेत्र) | 11 | 9 | 02 |
| | 24 डिसेंबर 2014(आ. क्षेत्र) | 8 | 5 | 3 |
| | 14 जून 2014(रा. क्षेत्र) | 7 | 5 | 2 |
| 2013-14 | 10 एप्रिल 2015(आ. क्षेत्र) | 5 | 4 | 1 |
| | 10 एप्रिल 2015(रा. क्षेत्र) | 5 | 4 | 1* |
| 2014-15 | 13 एप्रिल 2016(रा. क्षेत्र) | 5 | 4 | 1 |
| 2015-16 | 11 ऑगस्ट 2017(सा.सा. क्षेत्र) | 9 | 8 | 1 |
| 2016-17 | 28 मार्च 2018(सा.सा. क्षेत्र) | 18 | 17 | 01 |
| | 20 जुलै 2018(रा. क्षेत्र) | 4 | 2 | 2 |
| 2017-18 | 02 जुलै 2019(सा.सा. क्षेत्र) | 13 | 12 | 1 |
| | 02 जुलै 2019(आ.क्षेत्र) | 12 | 11 | 1 |
| | 4 मार्च 2020(रा. क्षेत्र) | 4 | 2 | 2 |
| | 4 मार्च 2020(सा. उप.) | 9 | 5 | 4 |
| 2018-19 | 8 सप्टेंबर 2020 (सा. सा. क्षेत्र व सा. उप.) | 12 | 9 | 3 |
| | | 1 | 0 | 1 |
| | 8 सप्टेंबर 2020 (रा. क्षेत्र व आ. क्षेत्र) | 7 | 4 | 3 |
| | | 5 | 3 | 2 |
| **एकूण** | | **135** | **104** | **31** |

**सा. सा. क्षेत्र:** सामान्य व सामाजिक क्षेत्र; **आ. क्षेत्र:** आर्थिक क्षेत्र; **रा. क्षेत्र:** राजस्व क्षेत्र; **सा. उप.:** सार्वजनिक उपक्रम

*परिच्छेद लोक लेखा समितीमध्ये चर्चिला गेला परंतु स्पष्टीकरणात्मक ज्ञापन प्राप्त झाले नाही.

**तक्ता 1.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे लेखापरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट केलेल्या 135 परिच्छेद आणि आढाव्यांपैकी, 31 स्पष्टीकरणात्मक ज्ञापने तीन महीने ते 78 महिन्यांच्या कालावधीसाठी प्रलंबित होती.

लेखापरीक्षा अहवालामध्ये भाष्य केलेल्या सर्व मुद्दयांविषयी कार्यका-यांची जबाबदारी निश्चित करण्याच्या उद्देशाने लोक लेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समिती प्रत्येक प्रकरणांत तिच्या शिफारशींवर विभागांनी किती कालावधीत कार्यवाही केल्याच्या टिप्पण्या पाठविणे आवश्यक आहे ते निश्चित करते.

2010-11 ते 2016-17 या वर्षासाठीच्या लेखापरीक्षा अहवालांशी संबंधित 144 परिच्छेदांवर लोक लेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीमध्ये चर्चा करण्यात

आली आणि 944 शिफारशी दिल्या, ज्यापैकी 557 शिफारशींवरील केलेल्या कार्यवाहीच्या टिप्पण्या प्रलंबित होत्या जे **तक्ता 1.6** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 1.6: लोक लेखा समितीच्या शिफारशींवरील कार्यवाही केल्याच्या प्रलंबित टिप्पण्यांची स्थिती**

| लेखापरीक्षा अहवालाचे वर्ष | लेखापरीक्षा अहवाल | लोक लेखा समितीचा व सार्वजनिक उपक्रम समिती अहवाल क्रमांक | लोक लेखा समिती व सार्वजनिक उपक्रम समितीचे वर्ष | लोक लेखा समिती व सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींची संख्या | प्रलंबित कार्यवाही केल्याच्या टिप्पण्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| **2010-11** | सा.सा. क्षेत्र | 12, 17 | 2015-16 | 37 | 10 |
| | रा. क्षेत्र | 9, 16 | 2015-16 | 26 | 16 |
| | सा. उप. | 08,09,16,20 | 2015-16<br>2017-18 | 6 | 3 |
| **2011-12** | सा.सा. क्षेत्र | 29,32 | 2017-18 | 102 | 44 |
| | आ. क्षेत्र | 35 | 2017-18 | 09 | 08 |
| | रा. क्षेत्र | 33 | 2017-18 | 13 | 11 |
| | सा. उप. | 8, 11, 18, 20 | 2015-16<br>2017-18 | 10 | 4 |
| **2012-13** | सा.सा. क्षेत्र | 24 | 2015-16 | 18 | 18 |
| | | 27, 31 | 2017-18 | 66 | 24 |
| | आ. क्षेत्र | 38, 64 | 2017-18 | 151 | 123 |
| | रा. क्षेत्र | 37 | 2017-18 | 14 | 07 |
| **2013-14** | सा.सा. क्षेत्र | 19 | 2015-16 | 47 | 36 |
| **2014-15** | सा.सा. क्षेत्र | 47, 52, 57 | 2017-18 | 84 | 51 |
| | रा. क्षेत्र | 54 | 2017-18 | 37 | 37 |
| **2015-16** | सा.सा. क्षेत्र | 40,41 | 2017-18 | 32 | 32 |
| | आ. क्षेत्र | 42, 39 | 2017-18 | 63 | 61 |
| | रा. क्षेत्र | 56 | 2017-18 | 19 | 14 |
| | भाड़ेतत्वावर दिलेल्या शासकीय जमिनीचा स्वतंत्र अहवाल (रा. क्षेत्र) | 26 | 2015-16 | 171 | 19 |
| **2016-17** | सा.सा. क्षेत्र | 58, 59, 67 | 2017-18 | 39 | 39 |
| **एकूण** | | | | **1041** | **557** |

लोक लेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीच्या ज्या शिफारशींवर कार्यवाही केल्याच्या टिप्पण्या प्राप्त झाल्या नव्हत्या त्यांची विभाग-निहाय स्थिती **परिशिष्ट 1.4** मध्ये दर्शविली आहे. **परिशिष्ट 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 18 विभागांकडून प्रलंबित असलेल्या 557 शिफारशींवरील कार्यवाही केल्याच्या टिप्पण्यांपैकी सर्वाधिक टिप्पण्या (126 टिप्पण्या) ह्या जलसंपदा विभागाच्या होत्या.